Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 3, Sept 2012
ISSN:-2231-5063

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

कर्णबधिर मुलांसाठी सर्वसमावेशक शाळांची तयारी

वर्षा गट्टू

शिक्षा विभाग प्रमुख
आसावरी शिंदे, विशेष शिक्षिका
अ.या.जं. राष्ट्रीय श्रवण विकलांग संस्थान, मुंबई

सारांश

'सर्वसमावेशक शिक्षण' ही संकल्पना हळूहळू आपल्याकडे मूळ धरत आहे. परंतु या संकल्पनेचे अपेक्षित स्वरूप साकारताना शाळांना व शिक्षकांना काही गोष्टींचा नीट ताळमेळ घडविणे आवश्यक आहे. सर्वसमावेशित शिक्षणाकरिता संपूर्ण शालेय व्यवस्थेचे अनुकूलन करणे आवश्यक आहे. हयाकरिता सर्वांच्याच सहकार्याची गरज असते. शाळेतील वातावरण स्वागतार्ह असल्यास, विशेष गरजा असलेल्या मुलांच्या मनात सकारात्मक भावना रूढ होते. विशेष गरजा असणाऱ्या कर्णबधिर मुलांचे अपंगत्व बाहयरूपी न दिसल्याने हया मुलांच्या बाबतीत तर अनेक गैरसमज निर्माण होतात. सर्वसाधारण मुलांच्या शाळेच्या वातावरणात हया मुलांचे निर्भयपणे एकरूप होणे ही प्रक्रिया अतिशय नाजूक असल्यामुळे ती विशिष्ट पद्धतीनेच हाताळणे आवश्यक आहे. हे आव्हान यशस्वी करण्याकरिता, शाळांना मार्गदर्शन व्हावे, या हेतूने प्रस्तुत लेख लिहिला गेला आहे.

पार्श्वभुमीः

आपण कल्पनाही करू शकत नाही, इतक्या असंख्य व्यक्तिंना त्यांच्यातील अपंगत्वामुळे आजही शिक्षणापासून वंचित रहावे लागते आहे. UNESCO (2009) च्या एका दस्तावेजानुसार शाळेत न दाखल झालेल्या 77 दशलक्ष मुलांपैकी जवळजवळ 1ध्3 मुले विकलांग आहेत. हया मुलांना जरी शाळेत प्रवेश दिला गेला तरीही शाळेतील 1ली ते 10वी चे शिक्षण होईपर्यंत मुले टिकून राहतील याची खात्री देता येत नाही. कारण प्राथमिक शाळेतील प्रवेशांचे प्रमाण सुधारत असले मात्र गळतीचे प्रमाण कमी झालेले दिसत नाही. NIEPA (2005) च्या निरीक्षणानुसार प्राथमिक शाळेतील प्रवेश प्रक्रिया 6.3 : ने वाढलेली आहे पण प्राथमिक शिक्षण घेत असलेली 41.89ः मुले शाळा सोडताना दिसून येतात. UNESCO च्या सांख्यिकी संस्थांच्या Institute of Statistics (2004) सालच्या आकडेवारीनुसार भारतातील जवळजवळ 50ः मुले प्राथमिक शिक्षणानंतर शाळा सोडतात. यामुळे या मुद्यावर गंभीररित्या आत्मपरीक्षण करून त्या दिशेने ठोस पावले उचलण्याची नितांत गरज आहे. सर्वसमावेशक शिक्षण Inclusive Education ही वैश्विक दृष्टया मान्यताप्राप्त चळवळ आहे. 'सर्वांसाठी शिक्षण' Education वित All (EFA) हा हया संकल्पनेचा आधार स्तंभ आहे. सलॅमनका फ्रमवर्क Salamance Framework (1994) ने देखील हया मोहिमेला सक्षम पाठिंबा देण्यासाठी विकलांग व्यक्तिंसाठी अवरोध मुक्त वातावरण निर्माण करण्याचे सुचविले आहे. हयाच्या अंतर्गत सामान्य शाळांनी, अपंग मुलांच्या बाबतीत समावेशनाकरीता कोणत्या अशा जबाबदाऱ्या व भूमिका अमलात आणाव्यात हे विस्तृत रित्या नमूद केले आहे. हया प्रमाणे प्रत्येक सामान्य शाळेने अपंग मुलांना निरंतर आधार देऊन त्यांच्या विशेष गरजा पूर्ण करणाऱ्या आवश्यक सोयी कराव्यात असे स्पष्ट होते. हयाचे कारण असे की कालांतराने अपंगांकडे बघण्याचा दृष्टीकोण बदलत आहे. विकलांगतेकडे वैदयकीय दृष्टीने (medical model) बघण्याऐवजी त्याकडे सामाजिक (social issue) म्हणून बघावे व विकलांग व्यक्तींना मानवी हक्क मिळवून दयावे हयावर UNCRRD (2007) ने शिक्कामोर्तब केले आहे.

वरील सर्व मांडणी मधून असा आशय व्यक्त होतो की सर्वसमावेशक शिक्षणाकरीता एक अशी शालेय यंत्रणा तयार व्हावी की ज्यात दूर सारले गेलेले किंवा सारले जाऊ शकणारे प्रत्येक मूल सामावून घेता येईल. ही यंत्रणा व्यवस्थितपणे कार्यान्वित होण्यासाठी सर्वांचाच सकारात्मक दृष्टिकोण असणे आवश्यक आहे.

Please cite this Article as : *वर्षा गट्टू , 'कर्णबधिर मुलांसाठी सर्वसमावेशक शाळांची तयारी* **: Golden Research Thoughts (Sept ; 2012)**

कर्णबधिर मुलांची शालेय तयारीः

कर्णबधिरत्व हे अदृष्य अपंगत्त्व असून ते बाहयरूपी दिसून येत नाही. त्यामुळे हे अपंगत्त्व सहजी स्विकारले आणि मान्य केले जात नाही. ही बाब मात्र कर्णबधिर मुलांसाठी अहितकारक आहे. कारण लक्षातच न आल्यामुळे त्यावर उपाय योजना वेळच्या वेळी होत नाहीत. हया व्यतिरिक्त कर्णबधिर मुलांचा संघ हा भिन्न प्रकारचा (heterogeneous) असतो व इतर सर्व मुलांसारखीच हया गटातही मोठया प्रमाणात भिन्नता आढळते. ज्याप्रमाणे एकाच कुटुंबातील मुलांमध्ये किंवा जुळया मुलांमध्ये ही भिन्नता असते, तशीच ती विशेष गरजा असलेल्या मुलांमध्येही असणे स्वाभाविकच आहे. हयाची प्रमुख कारणे म्हणजे त्यांच्या श्रवणदोषाच्या निदानाचे वय, श्रवणदोषाचे प्रकार व क्षमतेचा वेगळेपणा ही आहेत. बऱ्याच कर्णबधिर मुलांमधील वेगळेपण त्याच्या कर्णबधिरत्वाचे निदान व हस्तक्षेपणाच्या सेवेच्या प्रकारावर अवलंबून असते. तसेच कुटुंबाची पार्श्वभूमी आणि पालकांचा सहभाग मुलांच्या संप्रेषण कौशल्याच्या वेगळेपणासाठी कारणीभूत असतो. हे वेगळेपण सर्वसमावेशक वर्गात गृहीत धरले जात नाही आणि म्हणूनच बहुतांशवेळी मुलांचे फक्त 'शारीरिक समावेशनच होते, शैक्षणिक समावेशन होत नाही'. हेच सर्वसमावेशक शिक्षणाच्या हेतूचे अपयश ठरते.

कर्णबधिर मुलांच्या शाळेतील अडचणीः

सर्वसामान्य शाळेतील शिक्षकांना अपंग मुलांना शिकवण्याचे प्रशिक्षण नसल्यास अपंग मुलांची कोंडी होते. कर्णबधिर मुलांच्या बाबतीत तर शिक्षकांना काही महत्त्वाच्या खबरदाऱ्या घ्याव्या लागतात. नीटसे ऐकू न आल्याने ही मुले इतरांचे ओष्ठ वाचन करू शकत नाहीत, म्हणूनच इतर लोक काय बोलतात हे त्यांना उमजत नाही. सर्वसामान्य शाळेतील शिक्षकांचे मुख/ओष्ठ वाचन करण्यास कर्णबधिर मुलांना अडचणी येतात कारण शिक्षकांना मुलांशी मंद गतीने व ओठांची जास्त हालचाल न करता बोलावे, हे ठाऊकच नसते. शिक्षक फळयावर लिहिते वेळेस, फळयाकडे तोंड करून देखील बोलतात, म्हणून ते काय बोलतात/शिकवतात हे कर्णबधिर मुलांना कळत नाही. अशा वेळीस ही मुले आपल्या शेजारच्या विद्यार्थ्यांवर अवलंबून असतात.

शालेय विषय (भूगोल, गणित, विज्ञान, इतिहास, भाषा इ.) शिकवताना सुद्धा कर्णबधिर मुलांना दृक किंवा कृतीशील पद्धतीने शिकवलेले फायदेशीर ठरते. परंतु, सर्वसामान्य मुलांच्या वर्गात 40 ते 50 वर्गसंख्या असताना, एक किंवा दोन कर्णबधिर विद्यार्थ्यांसाठी निराळया पद्धतिचा/तंत्राचा वापर करणे कठीण जाते. तसेच वाचा आणि श्रवण प्रशिक्षणाची सोय सर्वसमावेशक शाळेत उपलब्ध नसल्याने मुलांचे शब्दोच्चार सुधारण्यास वाव मिळत नाही. परिणामतः ही मुले सर्वसामान्य मुलांबरोबर बोलताना संकोचल्यामुळे एकटी पडतात किंवा इतर मुलांमध्ये मिसळत नाहीत. सर्वसमावेशक शाळेत अभ्यासा व्यतिरिक्त विशेष मुलांना इतर कला कार्यक्रमात सहभाग घेण्यास देखील योग्य तरतुदीची आवश्यकता असते. उदा. जसे लिखीत स्वरूपाच्या सूचना ऐकू येण्यास इंडक्शन लूप सिस्टिम (Induction loop system) किंवा इतर सामूहिक श्रवण योजना (Group amplification system) हया सुविधा नसल्यास कर्णबधिरांना सर्वसामन्याच्या शाळेत अडचणी येवू शकतात. सर्वसामान्य शाळेत विशेष मुलांना श्रवणयंत्र लावल्यावर गोंगाटाचा कधी कधी खूप त्रास होतो. त्यामुळे ही मुले श्रवणयंत्र लावण्याचे टाळतात. श्रवणयंत्र न लावल्याने श्रवणशक्ती आणि वाचेत सुधारणा होत नाही व संप्रेषणात अडचणी येतात. परिणामतः हया मुलांना सामावून घेण्यात इतरांना अडचणी येतात. असे झाल्याने विशेष मुलांच्या मनावर व शिक्षणावर परिणाम होतो.

कर्णबधिर मुलांसाठी सामान्य शाळेला सर्वसमावेशक करण्याची तयारीः

Right to Education (RTE) (2009) च्या नुसार सर्वांना जवळच्याच म्हणजेच शेजारच्याच शाळेत शिकण्याची सोय असावी. हयाचाच अर्थ असा आहे की सर्वच शाळा सर्व प्रकारच्या अपंग मुलांना शिकवण्यासाठी सक्षम असाव्यात. कर्णबधिर मुलांच्या सर्वसमावेशनाकरिता तीन मुख्य बाबींची तयारी उपयुक्त ठरेल.



(1) वातावरणाची तयारीः

वातावरणच्या तयारीत भौगोलिक आणि अभौगोलिक बाबींचा समावेश असतो. भौगोलिक वातावरणात खालील गोष्टीं वर लक्ष देणे गरजेचे आहे.

शाळेतील व शाळेच्या आजूबाजूला असणारा आवाज
ओष्ठवाचनासाठी आणि सांकेतिक भाषापठना करिता लागणारा प्रकाश

हे अडथळे शाळा अशाप्रकारे कमी करू शकतात.

वर्ग आवाजाच्या गोंगाटापासून दूर ठेवावा आणि आवाजाची मर्यादा 60 कठ च्या वर नसावी.
वर्गातील लाकडी सामानाला रबरी बुश लावावे व भिंतीला आवाज शोषून घेणारे साहित्य वापरावे.
अध्ययन सुलभ करण्यास मुलांच्या बसण्याची सोय शिक्षकाच्या जवळ आणि समोर असावी.
ओष्ठवाचन सुलभ होण्यासाठी वर्गात योग्य उजेडाची सोय करावी.
गरजेनुसार वर्गात सामूहिक श्रवण यंत्राची व सांकेतिक पदजमतचतमजमत ची सोय करावी.

अभौगोलिक वातावरणातील खालील बाबींचा समावेश येतो. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे

(1)दृष्टिकोनात्मक अडथळे
(2)कर्णबधिरत्वाबद्दलची अजागरूकता

हे अडथळे शाळा अशाप्रकारे कमी करू शकतात.

सर्वसमावेशनाप्रति सकारात्मक आणि उत्साही धोरण बाळगावे.
विकलांग मुलांतील सामर्थ्याची ओळख करून घ्यावी.
पीयर टुटरिंग ;च्मत जनजवतपदहद्धए बडी सिस्टीम ;ठनककल ;मित्रद्ध`लेजमउद्धए सहकार अध्ययन ;ब्व.वचमतंजपअम स्मंतदपदहद्ध यांना प्रोत्साहित करावे.
मुलांच्या क्षमतेनुसार त्यांना योग्य कृतीमध्ये गुंतवावे.

(2) सोयी सुविधांची तयारीः

शाळेच्या पूर्व–तयारीत मानवी तसेच साहित्य संसाधनांचा मोठया प्रमाणात वाटा आहे. मानवी संसाधनात शिक्षक आणि विशेष शिक्षक, दुभाष्या, वाचा आणि श्रवण व्यावसायिक आणि आधारिक सेवेचा मार्गदर्शक इत्यादींचा खालील बाबींसाठी उपयोग करता येतील.

कर्णबधिर मुलांबरोबर संवाद साधण्यासाठी लागणाऱ्या विशिष्ट तंत्राची ओळख करून दयावी, तसेच त्यांच्या श्रवणयंत्राबद्दलची माहिती पुरवावी.
श्रवणदोषाचा परिणाम वाचा, संप्रेषण आणि साक्षर कौशल्यावर होतो ही गोष्ट समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. या करिताच शिक्षकांनी अध्यापन आणि मूल्यांकनासाठी वापरावयाच्या पर्यायी अध्यापन कौशल्यांचे विशेष प्रशिक्षण घ्यावे.
सर्वसमावेशक शाळांनी विकलांग मुलांसाठी फिरते विशेष शिक्षक आणि इतर तज्ञ समूहाच्या सदस्यांच्या सहकार्याने वैयक्तिक शैक्षणिक योजना ;प्दकपअपकनंसप्रमक म्कनबंजपवद च्तवहतंउउम ;प्च्द्ध अंमलात आणणे गरजेचे आहे.
कर्णबधिर मुलांच्या संवाद साधण्याच्या वेगवेगळया पद्धती दिसून येतात. काही बोलण्याचा प्रयत्न करतात, तर काहीजण सांकेतिक भाषेचा वापर करताना दिसतात, व इतर काहीजण परिपूर्ण संवाद साधतात. जी मुले संवाद साधताना हातांच्या खुणांचा वापर करतात, त्यांसाठी अनुवादकाची सोय आवश्यक असते.

साहित्यसंसाधना (material resources) करीता श्रवणसाधने आणि दृश्यात्मक स्वरूपाचे अध्ययन व अध्यापनाच्या साहित्याचा वापर करावा. पुढील साहित्याने शाळा सुजज्ज होवू शकते.

मुलांना ऐकु यावे म्हणुन वर्गात फ्रींकवंसी मॉडुलेटेड Frequency modulated (FM) amplification system किंवा loop induction system (ILS) वित amplification ची सोय असावी.
जेथे अनुवादकाची सुविधा उपलब्ध नसेल, जेथे मुलांना मुखवाचन करणे शक्य नसेल किंवा अशक्य असेल अशा ठिकाणी वाचेचे शाब्दिक आणि शाब्दिक स्वरूपाचे बोली भाषेत रूपांतर करण्याची सोय करावी.
चित्रांची पुस्तके आणि शैक्षणिक`वजिूंतम असावे.
जर नियमित पाठयपुस्तके वापरणे अवघड असेल, तर मुलांसाठी अनुकूलन केलेल्या (adapted) पाठयपुस्तकांची सोय असावी.
वैयक्तिक शिक्षण देताना बहुउद्देशीय संसाधन कक्षाची सोय (Resource room) असावी.

(3) अभ्यासक्रमाची तयारीः

यामध्ये अभ्यासक्रम आणि अभ्यासक्रमाच्या सोबतच्या इतर कार्यक्रमांचा समावेश होतो. कर्णबधिर मुलांना एक भाषा अवगत करण्यासही अथक प्रयत्न करावा लागतो म्हणूनच 1995 मध्ये अंमलात आलेल्या Person with Disability Act (PWD Act) च्या एका कायदयानुसार अभ्यासक्रमात या मुलांना एकच भाषा विषय सक्तीचा केला गेला. अभ्यासक्रमाच्या मांडणीतही काही नवीन कल्पनांचा विचार केला गेला. यासाठी शाळांनी अभ्यासक्रमाची तयारी पुढील प्रमाणे करावी.

कर्णबधिर मुलांची भाषा विषयांच्या अध्ययनाची अडचण लक्षात घेऊन प्रत्येक राज्य किंवा केंद्रीय विभागाच्या तपशीलानुसार अभ्यासक्रमाची पुनर्रचना करून पर्यायी विषयांच्या तरतूदीची त्यांच्याकडून मान्यता प्राप्त करून घ्यावी.
राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा National Curriculum Framework (NCF) (2006) ने असे सूचित केले की 'सांकेतिक भाषा' ही मुलांसाठी नमूना म्हणून पर्यायी भाषा असावी. यामुळे तिला आपोआप पसंती मिळून संवादात येणारे अडथळे कमी होतील आणि शाळेतील बहुतेक विदयार्थी आणि कर्मचारी यांच्यातील निपुणता वाढेल.
शिक्षण/माहिती पुरवण्यातील अनुकूलता आणि मूल्यांकनाच्या काही वेगळया पद्धती राबविणे, गरजेचे आहे. उदाहरणार्थः तोंडी परिक्षा कर्णबधिर मुलांना अवघड जाते हया करीता नाटयीकरणासारखे पर्याय मुलांना घेता येतील. अप्रत्यक्ष किंवा अनुमान सिद्ध प्रश्न (Indirect fdaok inferential questions) चे आकलन पण कधी कधी कर्णबधीर मुलांना अवघड जाते. हया करीता प्रश्नांचे स्वरूप बदलता येतील.
परीक्षेच्या कालावधीत देण्यात येणाऱ्या सूचना अगदी स्पष्टपणे दयाव्यात आणि परीक्षेसाठी जास्तीचा वेळ देणे सुद्धा अनिवार्य आहे.

कर्णबधिर मुले अभ्यासक्रमा व्यतिरिक्त असलेले इतर कार्यक्रम ही इतर सामान्य मुलांइतकेच सुंदर सादर करतात. त्यामध्ये प्रामुख्याने नृत्य, गाणे, नाटक, खेळ इ. कार्यक्रमाचा समावेश होतो. शाळांना अशा काही कार्यक्रमात जर कर्णबधिर मुलांना समाविष्ट करायचे असेल तर त्यांच्यासाठी खाली काही मार्गदर्शन केले आहे.

कर्णबधिर मुलांमध्येही खूप चांगली कायिक कौशल्ये असतात. ही मुले रंगमंचाशी संबंधित कलाकृतीचे सुंदर सादरीकरण करतात. परंतु ताल धरणे आणि संगीता संबंधित कला सादर करणे हे त्यांच्यासाठी एक आव्हान असते.
कर्णबधिर मुलांचे लक्ष विचलित होण्याचे प्रमाण फार कमी असते त्यामुळे जिथे नितांत एकाग्रतेची गरज असते अशी कला कौशल्ये ही मुले सहजतेने अवगत करतात त्यात विशेषतः नमूद करण्यासारख्या गोष्टी म्हणजे एकतर त्यांची आवड आणि दुसरे महत्त्वाचे असे की त्यांच्या भविष्यात ते आपल्या उदरनिर्वाहासाठी वापर करू शकतात अशा कलांचे प्रशिक्षण त्यांना देणे गरजेचे असते. उदा. चित्रकला, नक्षीकाम इ. आणि या सारख्या इतर कला.
खेळ आणि क्रीडा संबंधित कृतीसाठी संपूर्ण संघाचे कार्य परस्पर अनुकूल असणे गरजेचे असते किंवा बाहय प्रशिक्षण गरजेचे असते. अशा वेळी संघातील इतरांनी कर्णबधिर मुलांच्या संवादाच्या विविध शैली संबंधी सजग असायला हवे.

निष्कर्षः

जसे शाळांना सर्वसमावेशक बनविण्याची 'तयारी' गरजेची आहे तसेच ती सुविधा कायमस्वरूपी 'टिकवून' राहणे हयातच सर्वसमावेशक शिक्षण पद्धतीचे यश आहे. असे केल्यास 'सर्वोदय' म्हणजेच सर्वांचाच उदय होईल.

'The problem is not how to wipe out the differences, but how to unite with the differences intact'.
- Rabindranath Tagore

आभार

डॉ. वर्षा गट्टु यांच्या वरील लेखनाचा अंश भाग सर्व शिक्षा अभियानच्या बातमी पत्रात इंग्रजीत प्रकाशित झाला होता. त्याचा मराठीत अनुवाद करण्यास व प्रस्तुत लेखात समाविष्ट करण्याबाबतची मान्यता दिल्याबद्दल डॉ. अनुप्रिया चड्डा (Chief Consultant TSG, Ed.CIL) यांचे विशेष आभार. तसेच सौ. नेहा प्रभु आणि सौ. स्मिता गणात्रे हयांनी मराठीत अनुवाद करण्याकरिता दिलेल्या मार्गदर्शना बद्दल त्याचे ही मनःपूर्व आभार.

REFERENCES

National Curriculum Frame work (2006). National Curriculum framework. Curriculum group. Retrieved from
htttp://www.ncert.nic.in/html/pdf/Publication/Journal2008/Annual%20report%English%20 06-07/Chapter%202pdf on 22nd sept,2011
National Sample survey Organisation, (2002), Ministry of Statistics and program implementation. Govt. of India. Disabled persons in India.
The Salamanca Statement And Framework For Action On Special Needs EducationWorld Conference On Special Needs Education: Access And Quality Salamanca, Spain,7-10 June 1994, UNESCO, Spain. Retrieved from http://www.ecdgroup.com/download/gn1ssfai.pdf on18th May 2011
UNESCO (2003). 'The plurality of literacy & its implications for policies & programs'.Position & program paper of UNESCO Education Sector (2004). Retrieved from http://www.UNESCO.org
UNRCPD (2007). UN Convention on the Rights of Persons with Disabilities. OptionalProtocol to the Convention on the Rights of Persons with Disabilities. Retrieved from
http://www.svayam.com/?q=node/327/print
UNESCO (2006) Review on special needs education, retrieved from www.unesco.org/education/pdf on 25th Dec,2011.
RTE (2009). Retrieved from http://www.icbse.com/right-to-education-act on24th April 2011
NIEPA (2005). Retrieved from www.nuepa.org/Download/rightfreeeducation%20bill.pdf on 14th March,2012
PWD (1995).Retrieved from http://socialjustice.nic.in/pwdact1995.php.on 10th Jan, 2012